जाहिरात दिनांक : २०/०६/२०२१

अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक : २५/०६/२०२१

## जाहिरात

१. जिल्हा न्यायालय, नाशिकचे आस्थापनेवरील **‘सफाईगार’** या पदाकरीता उमेदवारांची प्रतिक्षा/निवड यादी तयार करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (आर.पी.ए.डी.) किंवा शीघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह द्वारे **‘‘सफाईगार पदाकरीता अर्ज’’** असे लिफाफ्यावर लिहुन **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक** (यानंतर ज्यास संक्षेपाकरीता ‘जिल्हा न्यायालय’ असे संदर्भित केले आहे) यांच्याकडे **दिनांक २५/०६/२०२१ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजेपर्यंत** अथवा त्यापुर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

३. दिनांक २५/०६/२०२१ या तारखेनंतर आलेले अर्ज, त्याचप्रमाणे साध्या पोस्टाने पाठविलेले अर्ज आणि समक्ष आणून दिलेले अर्ज किंवा लिफाफ्यावर **‘‘सफाईगार पदाकरिता अर्ज’’** असे नमूद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

पोस्टाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

४. **सफाईगारः-**

निवड / प्रतिक्षा यादीसाठी सफाईगार पदाची संख्या : १० (८+२)

५. **अर्हताः-**

शरीर प्रकृतीने सुदृढ असावा.

६. **वयोमर्यादाः-**

या जाहिरातीच्या दिनांकाच्या दिवशी उमेदवार १८ वर्षापेक्षा कमी वयाचा नसावा, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा व मागासवर्गीय असल्यास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावा. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दिनांक २३.०५.१९७८ नुसार शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्ये पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्याबाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथील केलेली आहे.

७. **कामाचे स्वरूपः-**

निवड झालेल्या उमेदवारास जिल्हा न्यायिक विभागांतर्गत कोणत्याही न्यायालयात **''सफाईगार''** या पदावर नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीनंतर उमेदवारास न्यायालयाच्या इमारतीतील व निवासस्थानातील प्रसाधनगृहांची, इमारतींची व परिसरांची नियमित स्वच्छता व साफ सफाई करणे, निगा राखणे इत्यादी कर्तव्ये पार पाडावी लागतील. तसेच अशा उमेदवारांनी न्यायालयाच्या आवारातील जागेची, बागेची निगा राखणेकामी आवश्यक ती सर्व कामे करावी लागतील. त्याचप्रमाणे अधिकारी यांचे निर्देशानुसार सर्व आवश्यक ती कामे करणे. सफाईगार हे पद एकाकी असून, पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. **वेतनश्रेणी :-**

सातव्या वेतन आयोगानुसार वेतन स्तर एस-१ या सुधारित वेतन संरचनेत रूपये १५,०००-४७,६००/- व नियमानुसार देय भत्ते.

९. **उमेदवारांकरिता सूचनाः-**

(१) जे उमेदवार यापुर्वीच शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या-त्या विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवूनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीच्या वेळी सादर करावी. उमेदवारांनी आपले अर्ज आपआपल्या विभाग/कार्यालय प्रमुखामार्फत **पाठविण्याची आवश्यकता नाही.**

(२) उमेदवाराने जर निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वतः किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायीक विभागाच्या अधिका-यांना भेटण्याचा किंवा इतर गैरमार्गाचा प्रयत्न केल्यास, त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

(३) अर्जाचा नमुना व सोबतच्या प्रमाणपत्रांचे नमुने जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिकचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/nashik यावर उपलब्ध आहेत. त्या नमुन्यातच अर्ज व सादर करावा.

(४) उमेदवाराने अन्य कोणतेही प्रमाणपत्र अथवा प्रमाणपत्रांच्या प्रती अर्जास जोडू नयेत.

(५) उमेदवाराने त्याचे/तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावुन त्यावर अशा प्रकारे स्वाक्षरी करावी की, स्वाक्षरीची सुरूवात छायाचित्रावर करून तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल.

(६) उमेदवाराने दोन सन्माननीय व्यक्तींनी जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्याचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली/चालु किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे. असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

(७) विहित नमुन्यात नसलेला आणि अपुर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविणेत येईल.

(८) **सफाईगारांच्या भरती प्रक्रीयेच्या वेळी जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास योग्य ते निकष लावुन पुढील प्रक्रीयेकरिता उमेदवारांची लघुसूची तयार करण्याचे अधिकार सल्लागार समितीस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील** व अशी तयार केलेली लघुसुची जिल्हा न्यायालय, नाशिक येथील सुचना फलक व https://districts.ecourts.gov.in/nashik या संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

(९) सफाईगार पदासाठी लघुसूचीत नमुद उमेदवारांची २० गुणांची चापल्य व साफ-सफाई कामाचे मुल्यमापन परीक्षा घेण्यात येईल.

(१०) सफाईगार पदासाठी चापल्य व साफ-सफाई कामाचे मुल्यमापन परिक्षेतील गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची २० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

(११) उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीकरिता, परिक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्वःखर्चाने हजर रहावे लागेल.

(१२) सेवाप्रवेश प्रक्रीयेच्या वेळापत्रकात काही कारणाने बदल झाल्यास किंवा अन्य महत्त्वाची सुचना असल्यास त्याची माहिती जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयाच्या सुचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परंतु तो बदल वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

(१३) वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहिल.

**१०. महत्त्वाच्या सुचना :-**

(१) ''नोंदणी क्रमांक'' हा अर्जातील रकाना कार्यालयाद्वारे भरण्यात येईल.

(२) अर्जाचा नमुना जिल्हा न्यायालय, नाशिकच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याप्रमाणेच असावा.

(३) प्रतिक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासुन ती फक्त ०२ वर्षांच्या कालावधीपर्यंतच वैध राहिल.

(४) ओळखपत्र असल्याशिवाय चापल्य परिक्षा व मुलाखतीस हजर राहण्यास परवानगी मिळणार नाही.

(५) उमेदवाराने स्वतःचा पुर्ण पत्ता पिनकोडसह, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी (असल्यास) लिहिलेला व २५ (पंचवीस) रूपयांचे पोस्टाचे तिकीट चिकटवलेला लिफाफा स्वतःचा पत्ता लिहिलेल्या आर.पी.ए.डी. च्या पोहोच पावतीसह अर्जासोबत जोडावा.

(६) उमेदवाराने त्याचे/तिचे एक जादा पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो) अर्जासोबत जोडावे.

(७) कोव्हीड-१९ चा वाढता प्रार्दुभावामुळे निवड प्रक्रीयेचे पुढील वेळापत्रक (लघुसूचीची यादी, कागदपत्र पडताळणी, चापल्य व साफसफाईची परिक्षा इ.) नंतर वरील नमुद संकेतस्थळावर व सर्व न्यायालयाच्या सुचना फलकावर जाहिर करण्यात येईल.

(८) **<u>या कार्यालयाने या भरतीसाठी कोणतेही शुल्क आकारलेले नाही</u>.** ही भरती पुर्णपणे विनाशुल्क आहे. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की अर्ज दाखल करतेवेळी कोणत्याही प्रकारच्या शुल्कापोटी कोणतेही दर्शनी धनाकर्ष (Demand Draft), प्रदानादेश (Pay Order), धनादेश (Cheque) इ. पाठविणार नाहीत.

आदेशावरून,

सही/-
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
नाशिक

दिनांक:- २०.०६.२०२१

------------

# जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक

## सफाईगार पदासाठी अर्ज

(टिप: अर्ज भरण्यापुर्वी जाहिरातीमध्ये दिलेल्या सुचना काळजीपुर्वक वाचा.)

उमेदवाराने नुकतेच काढलेले पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो स्वाक्षरी सहीत)

| नोंदणी क्रमांक (फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता) | N | S | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|

१. अर्जदाराचे नांव : ____________________

(प्रथम नाव) (पित्याचे/आईचे/पतीचे नाव) (आडनांव)

२. संपुर्ण पत्ता : ____________________

पिनकोड: | | | | | | |

भ्रमणध्वनी क्र. ____________________

ई-मेल आयडी (असल्यास) ____________________

३. सेवा योजन तसेच समाज कल्याण कार्यालय नोंदणी क्रमांक (असल्यास) : ____________________

४. लिंग : पुरूष / स्त्री

५. उमेदवार शासकीय सेवेत असल्यास, कार्यालयाचा तपशिल : ____________________

कार्यालयाची परवानगी घेतली आहे का? : होय / नाही

६. जात व प्रवर्ग : जात: __________ प्रवर्ग: __________

७. जन्म दिनांक (अंकात) : ______ दिनांक ______ महिना ______ वर्ष

(अक्षरात) : ____________________

८. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय : ______ वर्ष ______ महिने ______ दिवस

९. वैवाहिक स्थिती : अविवाहित / विवाहित

१०. सफाईगार कामाचा अनुभव आहे/नाही असल्यास त्याचा तपशिल : ______________________________

११. प्रकल्पग्रस्त : होय / नाही

१२. शैक्षणिक अर्हता:

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | कमाल गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इयत्ता चौथी | | | | | |
| २ | इयत्ता सातवी | | | | | |
| ३ | दहावी (एस.एस.सी) | | | | | |
| ४ | बारावी (एच.एस.सी) | | | | | |
| ५ | पदवी | | | | | |
| ६ | पदव्युत्तर | | | | | |
| | | | | | | |

१२. दिव्यांग असल्यास : होय / नाही ______________________________
(अ) स्वरूप
(ब) टक्केवारी ______________ (प्रमाणपत्रासह)

१३. इतर कामामध्ये विशेष रूची किंवा अनुभव असल्यास त्याचा तपशिल : ______________________________

१४. उमेदवाराला चारित्र्याचे दाखले दिलेल्या जबाबदार व्यक्तींची नाव, व्यवसाय व पत्ता : १) ______________________________

२) ______________________________

१५. फौजदारी खटल्यांचा तपशिल (असल्यास) :

| अ.क्र. | प्रलंबित / निकाली /प्रस्तावित फौजदारी खटल्याचा क्रमांक | खटल्याची माहिती | निकाल झालेला असलेस निकाल तारीख |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

१६.    महाराष्ट्र राज्याच्या न्यायखात्यात कार्यरत असलेल्या नातेवाईकांचा तपशिल :-

| अ.क्र. | नांव व ठिकाण | वय | पदनाम | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो /करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषीत केलेले नाही, मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्याविरूध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो / करते की, अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी/चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रीयेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड /नेमणुक झाल्यास, माझी सेवा कोणत्याही नोटीस शिवाय समाप्त केली जाईल, याची मला जाणीव आहे.

तसेच दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरून अपात्र ठरविण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक:    /    /२०२१                                        अर्जदाराचे नाव व सही

# नमुना 'अ'

# प्रतिज्ञापत्र

मी आवेदक / अर्जदार .................................................................. याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहिर करतो / करते की / सांगतो / सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही. तसेच माझेविरुध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच माझेविरुध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवुन शिक्षा ठोठावलेली नाही.

( आवेदक / अर्जदार राज्य / केंद्र शासन कर्मचारी असल्यास )

मी आवेदक / अर्जदार ................................................................ याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहिर करतो / करते की / सांगतो / सांगते की, माझेविरुध्द कोणतीही शिस्तभंगाची चौकशी प्रलंबित नाही. किंवा / तसेच मला कोणत्याही शिस्तभंगाच्या चौकशीत दोषी ठरवण्यात आलेले नाही.

मी आवेदक / अर्जदार ..................................................................याद्वारे प्रतिज्ञापुर्वक जाहिर करतो / करते की / सांगतो / सांगते की, मला आज दिनांक...../...../२०२१ रोजी ........ अपत्ये आहेत. त्यापैकी इतकी अपत्ये दिनांक २८ मार्च, २००५ नंतर म्हणजेच दिनांक ..../..../.......... (त्या अपत्याची जन्मतारीख येथे नमुद करावी), रोजी जन्माला आले आहे.

दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असल्यास, मी निवड प्रक्रियेतून कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविला जाऊ शकतो / शकते, याची मला जाणीव आहे.

स्थळ :

दिनांक :     /     /२०२१                                                    आवेदकाचे नाव व स्वाक्षरी

(............................................)

टिप :- आवेदक अविवाहीत असल्यास त्याने वरील प्रतिज्ञापत्रात आवश्यक त्या ठिकाणी 'लागू नाही' असे नमुद करावे.

## <u>नमुना 'ब'</u>

## <u>चारित्र्य (वर्तणुक) प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ................................................... हे / हया ............................................. तालुका ...................., जिल्हा ...................., येथील रहिवासी असून, मी त्यांना मागिल .............. वर्षांपासून ओळखतो. त्यांची वर्तणुक व चारित्र्य चांगले आहे. ते / त्या माझे / माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वर्तणुक / चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे / दिले आहे.

प्रमाणपत्र देणा-याचे नाव व सही .............................

पत्ता : .....................................................

...............................................................

. .............................................................

स्थळ :

दिनांक : / /२०२१

भ्रमणध्वनी क्रमांक : .........................................